# अभ्यासकाची भूमिका

एक महिला आमदार म्हणून प्रस्तुत प्रबंधकर्तीस जो अनुभव आला व इतर महिला आमदारांचा, महिला मंत्र्यांचा सहवास लाभला त्यांना जवळून पाहताना, अनुभवताना, ऐकताना नकळत मनात तुलनात्मक अभ्यास सुरू झाला. शिक्षित, उच्चशिक्षित, ग्रामीण स्तरातून आलेल्या, कायद्याचा अभ्यास केलेल्या, अध्यापनाचे काम केलेल्या, समाजकार्यातून पुढे आलेल्या वा राजकीय कुटुंबाचा वारसा लाभलेल्या महिला आमदारांमधील अभिव्यक्तीचे वेगवेगळे कंगोरे, पदर समोर आले. त्यांच्या दृष्टिकोणातील परिपक्वता अनुभवांचे बोल, मातृत्वाची दृष्टी मला भावली, हे सर्व मी Observer (निरीक्षक) म्हणून त्याकडे पाहिले आहे, अनुभवले आहे, शिवाय मी एक Participator (सहभागी) या सर्व कामकाजात होते. मी एक त्यातला भाग होते. म्हणून मला वाटले आपण या महिला आमदारांच्या भाषणांवर अभ्यास करायला हवा, त्यांच्या विविधांगी भूमिकांचा आढावा घेण्याचा मी प्रयत्न केला आहे. राजकीय क्षेत्रात महिलांचा प्रवेश कसा झाला? कधी झाला? सुरूवातकशी झाली? प्राचीन महाराष्ट्रातील हिंदुस्थानातील मराठी स्त्रियांनी राजकारण कसे केले? हे पाहिल्याशिवाय, या गोष्टींना प्राथमिकता दिल्याशिवाय पुढील अभ्यास अपुरा होईल.

विसाव्या शतकात जगाच्या राजकारणात फार मोठ्या प्रमाणात बदल झाले. या काळात दोन महायुद्धे झाली. १९ व्या शतकात मतदानाचा अधिकार मर्यादित होता. स्त्रियांना मतदानाचा अधिकारच नव्हता.

इंग्लंड व अमेरिका या प्रगत राष्ट्रात १९१८ नंतर स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला व त्यानंतर राजकारणात स्त्रियांचा सहभाग वाढू लागला. १९५० नंतर महिलांचा जागतिक राजकारणावर प्रभाव दिसून येतो. त्यात प्रामुख्याने सीरिमाओ, भंडारनायके, गोल्डा मायर, इंदिरा गांधी, मार्गारेट थॅचर, बेनझीर भुट्टो, चंद्रिका कुमारतुंगा, शेख हसीना, बेगम खलिदा झिया यांचा समावेश होतो.

जगातल्या प्रगत राष्ट्रामध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळण्यासाठी खूप प्रतिक्षा करावी लागली. त्यामानाने भारतात स्वातंत्र्याबरोबरच महिलांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला.

दुसऱ्या महायुद्धानंतर १९४६ च्या मार्च – एप्रिल मध्ये सार्वत्रिक निवडणुका होऊन नवीन विधिमंडळे अस्तित्वात आली. त्यावेळी विधिमंडळात मुंबईत काँग्रेसच्या ४ व मुस्लीमलीग १ महिला उमेदवार विजयी झाल्या. पुण्याहून काँग्रेसच्या सुमतीताई गोरे, हिंदू महासभेच्या

जानकीबाई जोशी विजयी झाल्या, तर कोल्हापूर संस्थानातून इंदिरा देशपांडे या काँग्रेसच्या तिकिटावर बिनविरोध निवडून आल्या. निवडून आलेल्या ७ महिला सदस्यांपैकी सुमतीताई गोरे व ताराबाई मोडक या महाराष्ट्रातील दोन प्रसिद्ध शिक्षणतज्ञ होत्या. काँग्रेस कार्यकर्त्या असून १९४२ च्या चळवळीत कारावासही भोगला होता.

१९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीत त्यावेळच्या मुंबई राज्यात गुजरात वगळून उरलेल्या महाराष्ट्राच्या प्रदेशातून १७ पैकी १४ महिला निवडून आल्या होत्या. त्यात सरोजिनी बाबर यांचाही समावेश होता. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री सदस्यांनी जेवढ्या प्रमाणात विधानसभेत भाग घेतला, तेवढा ही या सदस्यांनी घेतला नाही. १९५७-१९६२ या काळात १४ महिला आमदार होत्या. यामध्ये विमला बागल यांचे काम प्रभावी होते. द्विभाषिक राज्याच्या या विधानसभेत ३९६ सदस्य होते. विमलाबाईंनी २७४ उपप्रश्न उभे केले. त्यामध्ये राज्यातील आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रश्नांना प्रथम प्राधान्य दिले.

मतदारसंघातील प्रश्नांना दुसरे व महिला विषयक प्रश्नांना तिसरे स्थान दिले. २४ फेब्रुवारी, १९५९ ला विमलाबाईंनी स्त्री शिक्षण मोफत करावे व २ डिसेंबर, १९६० ला दोन ते सहा वर्षांच्या मुलांना मोफत शिक्षण दिले जावे असे दोन अशासकीय ठराव मांडले. आज शासनाने मुलींना माध्यमिक व उच्च शिक्षण ही मोफत केले आहे. याचे श्रेय काही प्रमाणात विमलाबाईंच्या प्रयत्नांना जाते. १९६२ ला १५ महिला निवडून आल्या. १९६७ च्या चौथ्या विधानसभेतील डॉ. सुशिला बजाज, सौ. प्रतिभा पाटील, सौ प्रभा झाडबुके, श्रीमती निर्मला राजे भोसले निवडून आल्या होत्या. त्यांनी विधिनंडळात विविध विषयांवर भाषणे केली. एकूण १२ महिला १९६७ मध्ये निवडून आल्या होत्या.

पाचवी विधानसभा १९७२ – १९७७ निवडणूकीत काँग्रेसच्या २६ व प्रजा समाजवादी पक्षाच्या मृणाल गोरे निवडून आल्या. एकूण २७ महिला उमेदवार निवडून आल्या होत्या. त्यामध्ये विधिमंडळात आपल्या कामाने ठसा उमटविणाऱ्या दोन आमदार होत्या, एक मृणाल गोरे व दुसऱ्या निर्मलाताई ठोकळ. विधान परिषदेत १९५२-१९७५ एकूण २२ महिलांनाच सदस्यत्व मिळाले. शांताबाई दाणींचा उल्लेख प्रभावी कामासाठी व दलित प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी करावा लागेल.

दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर खऱ्या अर्थाने राजकारणाच्या क्षेत्रात महिलांचा प्रवेश झाला. शिक्षण आणि बाहेरच्या जगाशी संपर्कात आल्यावर राजकारणात स्त्रिया अधिक सतर्क आणि सक्रिय बनल्या.

---

तळटीप – गवाणकर रोहिणी :'मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रूप' आदित्य प्रकाशन कोथरूड, १९८६ पृ.क्र.७ व ८

महाराष्ट्रात १९९० पासून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३०% आरक्षण ७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीच्या आधारे राखीव जागा धोरण लागू करण्यात आले. आज निवडून आलेल्या महिलांची संख्या लाखाच्या वर जाते. आजच्या राजकारणाचा चेहरा मोहरा पूर्णतः बदलून टाकण्याची ताकद या महिलांमध्ये नक्कीच आहे. औपचारिक राजकीय प्रक्रियेत प्रभावी कार्यकर्ता म्हणून महिलांचा विकास साधण्यात या धोरणाचा सिंहाचा वाटा आहे. आज विधानसभा व लोकसभा सभागृहात युवकांचे प्रमाण वाढले आहे. युवतीनीही मोठ्या प्रमाणावर सहभागी होण्याची गरज भासते आहे.

या देशात सुषमा स्वराज, प्रतिभाताई पाटील, सुमित्रा महाजन, अहिल्या रांगणेकर, मृणाल गोरे, जयवंती बेन मेहता, वसुंधरा राजे यांच्या सारख्या अनेक महिला नेत्यांनी आपले वक्तृत्व, कर्तृत्व व नेतृत्व सिद्ध करून दाखविले आहे. मार्गारेट अल्वा यांनी प्रदूषण मुक्त दिल्ली करायचे मनावर घेतले. एक बांधिलकी म्हणून त्यांनी आपल्या विचारक्षमतेचा कौतुकास्पद वापर केला आहे.

लोकसभेत किंवा विधानसभेत महिला लोकप्रतिनिधी महिलांच्याच विषयावर बोलतात असे नाही. विधान परिषदेत शेती विषयक ठरावावर चर्चेत स्त्री बोलायला उभी राहिल्यावर समोरून विचारणा होते, “तुम्हाला काय कळतयं शेतीचे?” पण जेव्हा स्त्री आमदार शेतीविषयी विविध अंगाने आपले विचार सप्रमाण मांडते, तेव्हा ते त्यांना मान्य करावेच लागते.

समाजालाही वाटले पाहिजे की, स्त्री परिवर्तित होत आहे? तिच्या बदलाचे स्वागत समाजाने केले पाहिजे. तिच्या चांगल्या कामाचे कौतुक केले पाहिजे. प्रचार, प्रसार माध्यमांनाही महिला नेत्यांच्या कार्याचा गौरव, त्यांच्या चांगल्या कामांना, भाषणांना प्रसिद्धी दिली पाहिजे. उपजतच सर्व महिला नेत्या प्रसिद्धी पराङमुख नसतात किंवा काही महिला नेत्यांचा स्वभावही प्रसिद्धी लोलूप नसतो. परंतु समाजाला या नेतृत्वाचा परिचय व्हायला हवा. स्त्रीने सभागृहात मातृसुखाने केलेल्या आविष्काराचे अनुसंधान चिकित्सेने एकत्र मांडून दाखविले, तर भाषा साहित्यसंस्कृती या समवेत समाजाचा व पर्यायाने राष्ट्राचाही लाभ होईल. याच विचाराने सदर संशोधनाचा प्रकल्प सिद्धीस न्यावयाचा आहे.

स्त्री आमदार जेव्हा एखाद्या विषयावर सभागृहात बोलायला उभी राहते. त्यावेळी संपूर्ण सभागृहाचे लक्ष तिच्या बोलण्याकडे असते, ती कशी बोलते? काय बोलते? विषयाला धरून बोलतेय का? त्या विषयाचा अभ्यास दिसतोय का? सुसंगती आहे का? भाषा कशी आहे? दृष्टिकोण कसा आहे? याकडे बारकाईने सर्वजण पाहत असतात.

प्रत्यक्षात स्त्री आमदारांच्या भाषणात विचारांचे प्रकटीकरण विविध भावना व्यतित होत असताना दिसतात. विचारांचा ओलावा शब्दाशब्दांतून जाणवत असतो. त्यांचा भाषाशैलीतून समाजाच्या प्रश्नांचे कंगोरे, समाजमन खऱ्या अर्थाने अभिव्यक्त होत असते. साधारणतः पुरूष

आमदारांचे भाषण आक्रमक असते, टीकात्मक असते, उपहासात्मक असते, व्यंगात्मक असे यालाही अपवाद आहेत. यशवंतराव चव्हाण, वि.स.पागे, ना.धो. महानोर, रामभाऊ म्हाळगी, डॉ. अशोक मोडक अशा पुरूष आमदारांच्या भाषणांना सामाजिक, सांस्कृतिक साहित्यीक मूल्ये प्राप्त झालेली आहेत. परंतु स्त्री मूळातच हळवी असते. तिच्या वक्तृत्वाला गेयतेची किनार असते. अलंकारांचा सुगंध असतो, शब्दांनाही सजविण्याची धडपड असते, भावनेने ओथंबलेले शब्द तिचे मातृत्व सिद्ध करत असतात. म्हणूनच स्त्री आमदारांच्या भाषाशैलीचा साहित्याच्या दृष्टिने, संस्कृतीच्या दृष्टिने भाषण अभ्यास करावा असे मनापासून वाटते, म्हणून हा केलेला प्रयत्न आहे. एक महिला आमदार म्हणून प्रस्तुत प्रबंधकर्तीस जो अनुभव विधिमंडळात आला, इतर महिला आमदार व महिला मंत्र्यांचा सहवास लाभला त्यांना जवळून पाहताना, अनुभवताना, ऐकताना नकळत मनात तुलनात्मक अभ्यास सुरू झाला. विविध स्तरातून आलेल्या, एखाद्या राजकीय परंपरा असलेल्या घरांतून आलेल्या, कायद्याची पदवी घेतलेल्या, शैक्षणिक क्षेत्रात अध्यापनाचे काम केलेल्या शेतकरी कुटुंबातून आलेल्या, सर्व महिला आमदारांच्या भाषणांकडे पाहताना, ऐकताना, अभिव्यक्तीमध्ये असणारी विविधता, अनुभवातून आलेली परिपक्वता, विषयांकडे बघण्याचा दृष्टिकोण, भावना, स्त्री ही प्रथम माता असते, साहजिकच तिच्या भाषेला मातृत्वाचा ओलावा, संवेदनशिलता, मातृत्वाचा दृष्टिकोण तथा भाषा – समृद्धी, ग्रामीण बोली, भाषा, प्रमाणभाषा, कायद्याची भाषा यांतून पुरुष – स्त्री एखाद्या विषयाकडे बघण्याचा दृष्टिकोण, तुलनात्मक दृष्टिकोण आणि या सर्व माध्यमातून केलेल्या भाषणांचे मराठी भाषा साहित्य-संस्कृतीच्या संदर्भात मूल्यमापन केले आहे. मग त्यामध्ये उपमा, अलंकारांचा वापर असेल, म्हणी, वाक्प्रचारांचा चपखल प्रयोग असेल, भाषेचा स्त्रीवादी दृष्टिकोण असेल, भाषेची शास्त्रशुद्ध बैठक असेल, या सर्व गोष्टींचा अभ्यास इथे केलेला आहे.

या शोधनिबंधाची Research method वैज्ञानिक, दृष्टिकोणातून व संभाव्यता, विशेष नेमकेपणाने अधोरेखांकित करण्याचाही प्रयत्न केला आहे.

~*~*~*~